MHKO050026202020

**नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२० मधील**
**निशाणी १७ खालील आदेश**
**सौ. लक्ष्मी गणेश संकपाळ वि.**
**श्री. राजू बापू पाटील वगैरे १**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं.१ याने त्याचेविरुध्द झालेला "विना म्हणणे'' आदेश रद्द होवून मिळणेसाठी व त्याचे म्हणणे दावेत सामील करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्रं.१ याने आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं.१ यास समन्स लागू झालेनंतर कोव्हीड १९ रोगाच्या प्रादूर्भावामुळे ब-याच कालावधीकरिता कोर्ट कामकाज बंद होते. तसेच कोल्हापूर जिल्हा हा कोव्हीड १९ मुळे सर्वात जास्त प्रभावित होता. त्यामुळे शसनाचे बरेच निर्बंध होते. त्यामुळे प्रतिवादी क्रं.१ यास बाहेर पडणे अडचणीचे झाले होते. तसेच प्रतिवादी क्रं.१ हे आजारी पडल्याने केसल्या तारखेबाबत लवकर समजुन आले नाही. त्यामुळे मुदतीत वकीलांना भेटून त्यांना माहिती देवून म्हणणे मुदतीत दाखल करण्यास अडचणी आल्या होत्या. प्रतिवादी क्रं.१ यांचे नैसर्गिक व न्याय हक्क संरक्षण होणेचे दृष्टीने तसेच दाव्याचा अंतिमरित्या गुणदोषावर निर्णय होण्याच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्रं.१ याचा अर्ज मंजुर करुन सोबतचे म्हणणे पटलावर दाखल करुन घेण्याची विनंती त्यांनी केली.

३. वादीने अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली. वादीने आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, योग्य तो आदेश कॉस्ट सह करणेत यावा.

४. दाव्याचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द खरेदीपत्र रद्द होवून मिळणेकरिता व विवक्षित दादी मागणीचा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रं.१ ला नि.५ वरील अर्जावर म्हणणे दाखल करण्याची संधी देवून त्याला बचाव करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. तसे केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, प्रतिवादी क्रं.१ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होवून त्याला आपला बचाव करण्याची संधी मिळणार नाही. परंतु प्रतिवादी क्रं.१ ने आपले नि.५ वरील अर्जास म्हणणे मुदतीत दाखल केलेले नसल्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून काही रक्कम प्रतिवादी क्रं.१ ने वादीस अदा करणेबाबत आदेश करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो .

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी क्रं.१ ने वादीस रक्कम रु. २००/- अदा करावी.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Aishwarya Sagar Jadhav
Date: 2022.02.14 17:14:12 +0530

**(श्रीमती. ए. एस. जाधव)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
इचलकरंजी.

दिनांक :- १४/०२/२०२२
इचलकरंजी

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Orders are same, word to word, as per the original Judgment / Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | Shri. R. D. Jadhav |
| Name of Court | Sou. A. S. Jadhav,<br>4th Jt. Civil Judge Jr. Div., Ichalkarnaji. |
| Date of Dictation | 14/02/2022 |
| Order signed by P.O. on | 14/02/2022 |
| Order uploaded on | 14/02/2022 |